
# येशू येण्यापूर्वी देवाची उपासना करीत

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू, ह्या पाठातून तुझी उपासना प्रांजळ अंत:करणाने करण्यास मुलांना शिकव.''

मोठ्या मुलाने वा प्रौढाने 2 इतिहास 5 मधून प्राचीन इस्राएल लोक त्यांच्या नव्या मंदिरात कशी उपासना करीत ते सांगावे किंवा वाचून दाखवावे.


मग पुढील प्रश्न विचारा:

- शलमोनाने यरूशलेमेतील पवित्र सणासाठी कोणाला आमंत्रित केले? (उत्तर: पाहा वचन 2-3)
- त्यांनी काय अर्पण केले? (वचन 6)
- परमपवित्र स्थानात करूबांच्या पंखांखाली काय होते? (वचन 7)
- कराराच्या कोशामध्ये काय होते? (वचन 10)



- याजक व लेवी ह्यांनी परमेश्वराची स्तुती कशी केली? (वचने 12 व 13)
- याजकांनी परमेश्वराची स्तुती केल्यावर मंदिर कशाने व्यापून गेले? (वचन 13)

**स्पष्ट करा** येशू आला आणि त्याने आपला पवित्र आत्मा आमच्या ठायी राहण्यास पाठविला तेव्हापासून देवाची समक्षता एखाद्या इमारतीत नाही तर त्याच्या सर्व लोकांच्या अंत:करणांत आहे. पशूचे यज्ञार्पण हे येशूचे प्रतिक आहे. आज आपण पशूंचे अर्पण करीत नाही, कारण आमची सर्व पातके देवाच्या कोकऱ्याने येशूने दूर केली.



## कार्यकृती

इस्राएल लोक प्राचीन काळी देवाची उपासना कोणत्या पद्धतीने करीत हे मुलांना विचारा. मग उपासनेची पूर्वीची पद्धत आणि आज आपण देवाची उपासना करतो ती पद्धत यामध्ये तुलना करा. उदाहरणार्थ:

- इस्राएल लोक लाकूड आणि दगड ह्या गोष्टींनी बांधलेल्या मंदिरात उपासना करीत, परंतु आज आपल्याला कोठेही उपासना करता येते.
- इस्राएल लोकांचा कराराचा कोश हे देवाच्या समक्षतेचे प्रतिक आहे; पण, आज देव आमच्या ठायी वस्ती करतो.
- इस्राएल लोक पशूंचे होमार्पण करीत, परंतु आज आपण प्रभुभोजनामध्ये ख्रिस्ताचे शरीर सेवन करतो.



- इस्राएल लोक संगीताद्वारे आणि दान देऊन देवाची स्तुती करीत, आपण देखील तसेच करतो.
- इस्राएल लोक मूर्ती व अशुद्ध आत्म्यांना टाळत, आपणही या गोष्टी टाळतो.

मंदिराचे समर्पण ह्या वृत्तांताचे 2 इतिहास 5 मधून नाट्यीकरण करा:

- मुलांना नाटिका करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांची तयारी करण्यासाठी मदत करावी.
- लहान मुलांना याजक (चार) व लेवी ह्या भूमिका द्या.
- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी शलमोन, मुलगी, आई वडील, देवाची वाणी आणि निवेदक ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदक:** 2 इतिहास 5 मधील वृत्तांताचा सारांश थोडक्यात सांगून म्हणा, ''एक मुलगी आपल्या वडिलांना काय विचारते ते ऐका.''

**मुलगी:** वडिलांचा हात धरून चालत जा आणि म्हणा, ''आपण दोन दिवस चालत आहोत आपण कोठे जात आहोत?''

**आई वडील:** ''शलमोन राजाने मंदिर बांधले आहे. त्याचे समर्पण करण्यासाठी त्याने सर्व इस्राएल लोकांना यरूशलेमेला येण्याचे आमंत्रण दिले आहे.''

**मुलगी:** ''बाबा, ते बघा! ते याजक सोन्याने झाकलेला मोठा पेटारा वाहून नेत आहेत.''

**याजक:** कराराचा कोश खांद्यांवरून वाहून नेत असल्याचा अभिनय करा. दोघांनी पुढे चाला आणि दोघांनी त्यांच्या मागे काही अंतर ठेवून चाला. मग कोश खाली ठेवण्याचा अभिनय करा.

**आई वडील:** ''हा कराराचा कोश आहे. यात दहा आज्ञाचा पट ठेविलेला आहे. नव्या मंदिरातील परमपवित्रस्थानी ते हा कोश ठेवत आहेत. यामुळे आपल्याला सर्वसमर्थ देवाच्या समक्षतेची आठवण होते.'' (गुडघे टेकून बसा).

**मुलागी:** ''ते हा कोश कधी उघडणार?''

**आई वडील:** ''कधीच नाही! एकदा एका माणसाने याला हात लावला तेव्हा देवाने त्याला तडाखा देऊन मारले!''



**लेवी:** झांजा व तुताऱ्या वाजवीत चालण्याचा अभिनय करा.

**मुलगी:** ''तिकडे बघा, वादकांकडे झांजा, रणशिंग आणि तुताऱ्या आहेत!''

**लेवी:** एकत्र मोठ्याने म्हणा, ''परमेश्वराची स्तुती असो! त्याची दया युगानुयुग आहे!''

**मुलगी:** ''ते बघा काय! प्रभूचे मंदिर ढगांनी भरून गेले आहे! याजकांना आता तेथून निघाले पाहिजे!''

**लेवी:** वर आणि आजूबाजूला पाहा. हात उंचावून काही दिसत नसल्यासारखे चाला.

**आई वडील:** ''परमेश्वराच्या गौरवाच्या तेजाने देवाचे मंदिर भरून गेले आहे. पाहा शलमोन राजा प्रार्थना करीत आहे!''

**शलमोन:** तुमचे हात स्वर्गाच्या दिशेने पसरा आणि मोठ्याने बोला, ''हे प्रभू इस्राएलाच्या देवा, मी तुझ्यासाठी तुला युगानयुग राहावयासाठी वैभवशाली मंदिर बांधले आहे. पण तू पृथ्वीवर खरोखर मनुष्यप्राण्यांत वस्ती करशील का? आकाश व नभोमंडळ यात तुझा समावेश होत नाही, तर हे जे मंदिर मी बांधले आहे यात तो कसा व्हावा!''

**निवेदक:** देवाची वाणी स्वर्गातून उत्तर देते.

**देवाची वाणी:** ''मी यरूशलेम हे माझे नाव येथे समर्थ व्हावे म्हणून निवडले आहे. माझे नाव ज्यास दिले आहे त्या माझ्या लोकांनी दीन होऊन माझी प्रार्थना केली आणि माझ्या दर्शनाविषयी उत्सुक होऊन ते आपल्या दुष्ट मार्गापासून परावृत्त झाले तर मी स्वर्गातून त्यांची विनंती ऐकून त्यांच्या पापाची त्यांस क्षमा करीन व त्यांच्या देशातून क्लेश नाहीसे करीन.''

मुलांनी ही नाटिका प्रौढांसमोर सादर केली असेल तर त्यांना ह्या अभ्यासाच्या पान क्र. 1 वरील प्रश्न प्रौढांना विचारण्यास सांगा.

मुलांना स्वरमंडळाचे किंवा अन्य कोणत्याही संगीत वाद्याचे चित्र काढायला सांगा. यावरून देवाच्या समक्षतेचा आनंद आपल्याला संगीतासह कसा साजरा करता येतो ते दाखवा. मुलांनी त्यांची चित्रे मोठ्या माणसांना उपासनेच्या वेळी दाखवून माहिती सांगावी.



**कविता.** तीन मुलांना यशया 6:1-4 ह्या शास्त्रभागातून प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा:

उज्जीया राजा मरण पावला त्यावर्षी प्रभूस उच्चस्थळी असलेल्या उच्च सिंहासनावर बसलेले मी पाहिले,
त्याच्या झग्याच्या सोग्यांनी मंदिर व्यापून गेले होते.
त्याच्या भोवताली सराफीम उभे होते,
त्या प्रत्येकाला सहासहा पंख होते, दोहोंनी तो आपले तोंड झाकी,
दोहोंनी आपले पाय झाकी व दोहोंनी उडे.
ते आळीपाळीने उच्च स्वराने म्हणत, पवित्र! पवित्र! पवित्र!
सेनाधीश परमेश्वर! अखिल पृथ्वीची समृद्धी त्याचे वैभव होय.
घोषणा करणाऱ्यांच्या ह्या वाणीने उंबरठे हालले व मंदिर धुराने भरले.

लहान मुलांसाठी पाठांतर- स्तोत्र 87:3 मोठ्या मुलांसाठी इब्री 1:1,2

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु, तू शलमोन राजाला व इस्राएल लोकांना आपली समक्षता प्रकट केली याबद्दल तुला धन्यवाद देतो. आता येशूमुळे तू आमच्या प्रत्येकाच्या ठायी राहतोस. आम्ही आनंदाने तुझी स्तुती करतो.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net